जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा./आ.४ (९४)/२०२२/ 2891
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :- ०९/०६/२०२२

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC), शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अ‍ॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) परीक्षेच्या नोंदणी शुल्कासह आवेदनपत्र भरणेबाबत.**

**संदर्भ :-** १. जीसीसी (जुलै-२०२२), जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी-एसएसडी-सीटीसी (जुलै / ऑगस्ट-२०२२) दि.०२/०५/२०२२ रोजीची अधिसूचना.
२. या कार्यालयाचे जा.क्र.२५६९, दि.२३/०५/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयी व संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ मार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC), शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अ‍ॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) परीक्षा जुलै / ऑगस्ट-२०२२ मध्ये घेण्यात येणार आहेत.

संदर्भ क्र. १ अन्वेय सदर परीक्षांच्या नोंदणी शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये उपरोक्त नमूद परीक्षांच्या नोदंणी शुल्कासह आवेदनपत्र भरणेसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांची आवेदनपत्रे दि.०५/०६/२०२२ पर्यंत (नियमित + विलंब + अतिविलंब ) भरून झालेली आहेत. परंतू शुल्क भरणेबाबत तांत्रिक अडचणी आल्या आहेत अशा संस्थांना सदरील प्रविष्ट विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क अतिविलंब शुल्कासह भरणेसाठी या कार्यालयाच्या www.mscepune.in अधिकृत संकेतस्थळावर दि.०९/०६/२०२२ व दि.१०/०६/२०२२ या कालावधीत लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

उपरोक्त कालावधीतच संस्थांनी प्रविष्ट विद्यार्थ्यांचे अतिविलंब शुल्कासह परिक्षा शुल्क भरावे अन्यथा सदरील विद्यार्थ्यांना परिक्षेस प्रविष्ट होता येणार नाही याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

(संगीता घोडकर)
सहा.आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे-१

**प्रत माहितीस्तव :-**
१. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)

DESKTOP/GCC EXAM JULY-22/EXAMTIME LETTER